Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

SPECIAL ISSUE
"INDIAN FOREIGN POLICY AND PRESENT SCENARIO"

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

76

OLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
ANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारत - चीन संबंध<br>**प्रा. राख अरूण महादेव** | १-२ |
| २ | भारत पाकिस्तान संबंध<br>**प्रा. संजय हराळे** | ३-८ |
| ३ | दक्षिण आशिया : प्रादेशिक एकिकरणाची आवश्यकता आणि त्यापुढील आव्हाने<br>**विवेक बी. आवारे** | ९-१५ |
| ४ | भारत-ऑस्ट्रेलिया नागरी अणुकरार : एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. प्रमोद भगवानराव जाधव**<br>**माधुरी कचरू पवार** | १६-१७ |
| ५ | सिंधू काळातील व्यापार विषयक परराष्ट्र धोरण<br>**प्रा. डॉ. गणेश ह. घुगे** | १८-२१ |
| ६ | ब्रिक्स बँक - एक अभ्यास<br>**डॉ. व्ही. एच नागरे** | २२-२६ |
| ७ | भारताचे बदलते परराष्ट्र धोरण विशेष संदर्भ - अमेरिका<br>**डॉ. विलास आधाव** | २७-३६ |
| ८ | भारताचे परराष्ट्र धोरण : एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. काळे आर. के.** | ३७-४० |
| ९ | भारत - दक्षिण आफ्रिका सबंध आणि वाटचाल<br>**प्रा. डॉ. अजय पाटील** | ४१-४३ |
| १० | भारत - अमेरिका राजकीय संबंध<br>**डॉ. रामकिशन वसंतराव लोमटे** | ४४-४६ |
| ११ | भारतीय परराष्ट्र धोरणा पुढील आव्हाणे<br>**प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे** | ४७-५१ |
| १२ | भारत - पाकिस्तान संबंध<br>**प्रशांत मलकाप्पा माटे** | ५२-५५ |




77

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ८. भारताचे परराष्ट्र धोरण : एक दृष्टिक्षेप

**डॉ. काळे आर. के.**
सहाय्यक प्राध्यापक, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.

## प्रस्तावना

आज कोणतेही राष्ट्र जगात स्वयंपूर्ण राहू शकत नाही किंवा आपला विकास घडवून आणू शकत नाही. सर्व राष्ट्रांना परस्परांशी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्वरुपाचे संबंध ठेवणे गरजेचे असते. प्रत्येक देशातील शासनाला दुसऱ्या देशातील शासनाशी विशिष्ट पध्दतीचे आचरण ठेवावे लागते. तसेच देशाचे आचरण इतर देशाला त्यांच्या हितसंबंध रक्षणाच्या दृष्टीने प्रभावित करीत असते आणि याच उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी इतर देशांशी काही धोरणे आखावे लागते किंवा निती ठरवावी लागते त्याच धोरणास किंवा नितीस परराष्ट्र धोरण असे म्हणतात.

## परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या

परराष्ट्र धोरण म्हणजे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राप्रती किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहारासंदर्भात राष्ट्रीय उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आखलेले धोरण होय.

1. जॉर्ज मॉडेल्स्की यांच्या मतानुसार

परराष्ट्र धोरण म्हणजे राज्याच्या व्यवहाराची अशी विकसित पध्दती की, जीद्वारे एक राज्य दुसऱ्या राज्यास आपल्या इच्छेनुसार व्यवहार करण्यास सांगत असते किंवा आपल्या व्यवहाराची जुळवणी आंतरराष्ट्रीय पध्दतीनुसार करुन घेत असते

2. नार्मल हिलच्या मतानुसार

राष्ट्राचे इतर राष्ट्रांच्या संबंधात आपल्या हितसंबंधाची वृध्दी करण्यासाठी चालविलेल्या प्रयत्नाचा सार म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

थोडक्यात परराष्ट्र धोरण म्हणजे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्वीकारलेले धोरण किंवा व्यवहार होय.

## भारताचे परराष्ट्र धोरण

### 1. स्वातंत्र्यपुर्वकालीन भारताचे परराष्ट्र धोरण

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची जडणघडण स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली होती. 1857 च्या भारतीय उठावानंतर 2 ऑगस्ट 1858 मध्ये ब्रिटिश संसदेने Act for the better Government of India हा पारित करुन भारताचा राज्यकारभार ब्रिटिश सम्राटाच्या नावाने चालु केला. 1858 नंतरही ब्रिटिश सरकार भारतात साम्राज्यवादी धोरण राबविण्याकरिता, सीमांत राज्याकरिता अग्रभागी नीतिचा पुरस्कार केला. परंतू नंतर 1885 मध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना



78

परराष्ट्र धोरणाचा विचार केला नाही तर संपूर्ण आशिया खंडाच्या राजकारणाच्या दृष्टीकोनातून भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार केला. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून आशिया, अफ्रिका व लॅटिन अमेरिका या तिसऱ्या जगातील राष्ट्राचे सामूहिक हितसंबंध साधणे, दक्षिण -दक्षिण सहकार्य साधणे, वसाहतवाद, वंशवाद, शस्त्रास्त्र स्पर्धा याविरोधात सामूहिक जनमत निर्माण करणे, शीतयुध्द व त्याचा भाग म्हणून निर्माण झालेल्या लष्करी संघटना, ध्रुवीकरण याचा विरोध करणे व आंतरराष्ट्रीय न्याय साधण्याचा प्रयत्न करणे ही नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे होती. नेहरुच्या अशा परराष्ट्र धोरणापुढे सहाजिकच अमेरिका हा भारत या दोन्ही राष्ट्रात मतभेद होणे स्वाभाविक होते. राजकीय आघाडीवर भारत व अमेरिका यांचे मतभेद असले तरी आर्थिक सहकार्य सुरुवातीपासून राहिले होते. भारतानेही पाकिस्तानला अमेरिकेकडून होणारी लष्करी मदत विरोध करण्याची भूमिका ठेवली आहे. भारत आणि रशिया यांचे संबंध कोणत्याच काळात सारखे नव्हते. पंडित नेहरुची भूमिका स्पष्ट होती ते अमेरिका व रशिया या दोन्ही गटाशी समान रुपाने मैत्री ठेवू इच्छित होते असे असले तरी अगदी सुरुवातीपासूनच नेहरुचा कल रशियाकडे होता कारण रशिया ही साम्राज्यवाद विरोधी आहे. ही त्याची प्रतिमा होती. नेहरुंना संपूर्ण आशिया खंडाचे नेतृत्व करणारी, उदारमतवादी अशी भारताची आदर्शवादी प्रतिमा तयार करण्याची होती. परंतू ती स्वप्नाळू होती. नेहरुनंतर भारतामध्ये परराष्ट्र धोरणाची सुत्रबध्द आखणी केली नाही. प्रत्येक शासन जसजसे बदलत गेले तसतसे परराष्ट्र धोरण बदलत होते.

शीतयुध्दोत्तर परराष्ट्र धोरणाचा टप्पा अतिशय महत्वाचा आहे. याला 'पोस्ट नेहरुवियन पॉलिसी' म्हणतात. याकाळात आंतरराष्ट्रीय राजकारणाची समीकरणे पूर्णपणे बदलून गेली होती. कारण शीतयुध्दाचा शेवट झाला होता. त्यामुळे अमेरिका- रशिया, पुर्व युरोप आणि पश्चिम युरोप यांच्यामधील विचारसरणीवर आधारित जो संघर्ष होता, तो संपुष्टात आला आणि त्यामुळे सहकार्याचा मार्ग मोकळा झाला, त्यातून सर्व राष्ट्रे सहकार्याकडे वळली. तसेच व्यापारसंघ अस्तित्वात आले. विभागीय पातळीवर अनेक राष्ट्रे एकत्र येऊ लागली. राष्ट्रांनी आपल्या अर्थव्यवस्थामुक्त करण्यास सुरुवात करुन आर्थिक विकास आणि आर्थिक सहकार्यावर भर देण्यास सुरुवात केली. आंतरराष्ट्रीय राजकारणातला हा बदलता प्रवाह लक्षात घेऊन 1990 नंतर भारताने आपले परराष्ट्र धोरण बदलल्यास सुरुवात केली. पी.व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात भारतीय अर्थव्यवस्था मुक्त होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर इंद्रकुमार गुजराल यांच्याकडून भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सैध्दांतिकरण करण्याचा प्रयत्न झाला. त्यांनी भारताच्या शेजारी राष्ट्राबरोबर संबंध सुधारण्यावर भर दिला.

यानंतर अटलबिहारी वाजपेयी चे सरकार 1998 ते 2003 दरम्यान आले. त्यांनी भारतीय परराष्ट्र धोरणावरुन नेहरुंचा पगडा कमी करण्याचा प्रयत्न केला आणि भारताचे परराष्ट्र धोरण वास्तववादी बनविले व स्वत: अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. 2004 ते 2009 व 2014 या काळात युपीएचे मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आले त्यांनीही इतर देशाबरोबर संबंध सुरळीत करुन अमेरिकेशी संबंध सुधारणेवर भर दिला त्यातून भारताचे इतर देशाबरोबर व्यापारी हितसंबंध सुधारण्यास सुरुवात झाली व त्यातून इतर राष्ट्रामध्ये जसे विविध देश गुंतवणूक करतात तशी गुंतवणूक करण्यास भारतात सुरुवात झाली.



80

2014 मध्ये नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर आले यांनी प्रथम आपल्या शेजारी राष्ट्राशी आर्थिक व राजकीय संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. शेजारी राष्ट्राशी आर्थिक संबंध घनिष्ठ करण्यासाठी मोदींनी भूतान आणि नेपाळ यांच्यापासून सुरुवात केली. त्यानंतर आशिया, युरोप आणि अमेरिका या सगळया राष्ट्रांशी आर्थिक संबंध प्रस्थापित करण्यावर भर देऊन परदेशी गुंतवणूकीला आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. याबरोबर मोदींनी परराष्ट्र धोरण ठरवितांना राष्ट्रीय सुरक्षा आणि हितसंबंधाचे रक्षण यावर विशेष भर दिला. यासाठी परराष्ट्र धोरणात सुरक्षेशी निगडीत हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी एक चौकट तयार करण्यात आली त्या चौकटीच्या माध्यमातून आर्थिक विकास आणि संरक्षण सिध्दता यादोन्ही गोष्टी एकाच वेळी साधण्याचे ठरविले.

अशा पध्दतीने भारताच्या परराष्ट्र धोरणात नेहरुपासून मोदी पर्यंत बदल झालेला दिसतो.

संदर्भ

1. डॉ. शैलेंद्र देवळाणकर - भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, सकाळ प्रकाशन, पुणे 2017
2. डॉ. वा.भा. पाटील- भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव 2015
3. डॉ. पंडित नलावडे - आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन्स , औरंगाबाद 2014

81